राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक, सैनिकी शाळा व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना उपमुख्याध्यापक किंवा मुख्याध्यापक पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांची मूळ पदावरील वेतनश्रेणी संरक्षित करणे/पदोन्नतीच्या पदावर वेतन निश्चिती करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: एसएसएन-२०१२/(८२/१२)/माशि-२**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १९ जुलै, २०१२.**

**वाचा :** १) शासन निर्णय क्र. संकीर्ण १००३/(१०९/०३)/माशि-२, दिनांक १७ जून, २००५
२) शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दिनांक.२२ एप्रिल, २००९
३) शासन निर्णय क्र. सवेआ/१००८/(५२१/०८)/माशि-२, दिनांक १२ जून, २००९

**प्रस्तावना :-**

पाचव्या वेतन आयोगानुसार राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, सैनिकी शाळा, माध्यमिकचे वर्ग जोडलेली कनिष्ठ महाविद्यालये व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना उपमुख्याध्यापक किंवा मुख्याध्यापक पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांची मूळ पदावरील वेतनश्रेणी संरक्षित करणे / पदोन्नतीच्या पदावर वेतन निश्चिती करणेबाबत संदर्भाधीन क्र.१ च्या दिनांक १७ जून, २००५ च्या शासन निर्णयान्वये शिक्षकांची उपमुख्याध्यापक / मुख्याध्यापक पदावर किंवा उपमुख्याध्यापकाची मुख्याध्यापक पदावर पदोन्नती झाल्यास, ते पदोन्नतीपूर्वी, शिक्षक किंवा उपमुख्याध्यापक या पदावर जी वेतनश्रेणी घेत होते त्या वेतनश्रेणीपेक्षा पदोन्नतीनंतर त्यांना निम्न वेतनश्रेणी किंवा समकक्ष वेतनश्रेणी देय होत असल्यास त्यांची पूर्वीच्या पदावरील वेतनश्रेणी संरक्षित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, सैनिकी शाळा, माध्यमिकचे वर्ग जोडलेली कनिष्ठ महाविद्यालये व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना

दिनांक १२ जून, २००९ च्या शासन निर्णयाद्वारे सहाव्या वेतन आयोगांतर्गत त्रिस्तरीय वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात आलेले आहे. दिनांक १७ जून, २००५ च्या शासन निर्णयान्वये वेतनश्रेणी संरक्षित करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सहाव्या वेतन आयोगानुसार सदर पदांचे वेतन बँड व ग्रेड वेतन संरक्षित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, सैनिकी शाळा, माध्यमिकचे वर्ग जोडलेली कनिष्ठ महाविद्यालये व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांची उपमुख्याध्यापक / मुख्याध्यापक पदावर किंवा उपमुख्याध्यापकाची मुख्याध्यापक पदावर पदोन्नती झाल्यास, ते पदोन्नतीपूर्वी, शिक्षक किंवा उपमुख्याध्यापक या पदावर त्यांना ज्या वेतन बँड व ग्रेड वेतन लागू होता त्या वेतनबँड व ग्रेड वेतनापेक्षा पदोन्नतीनंतर त्यांना निम्न वेतनबँड व ग्रेड वेतन किंवा समकक्ष वेतनबँड व ग्रेड वेतन देय होत असल्यास त्यांची पूर्वीच्या पदावरील वेतन बँड व ग्रेड वेतन संरक्षित करण्यास पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे :-

१) उपमुख्याध्यापक किंवा मुख्याध्यापक पदावर पदोन्नती मिळालेल्या शिक्षकास / उपमुख्याध्यापकास पदोन्नतीनंतर त्याच्या पूर्वीच्या पदापेक्षा निम्न वेतनबँड व ग्रेड वेतन अनुज्ञेय होत असेल तर, त्यास त्याच्या विनंतीनुसार पदोन्नतीच्या पदावर त्याच्या पदोन्नतीपूर्वीच्या पदाचा वेतनबँड व ग्रेड वेतन (ज्या वेतनबँड मध्ये व ग्रेड वेतनात वेतन घेत आहे ती यथास्थिती वरिष्ठ / निवडश्रेणी) संरक्षित करुन देण्यात यावी. तसेच पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती, संरक्षित करण्यात आलेल्या वेतनबँड व ग्रेड वेतनामध्ये करण्यात यावी.

२) वरीलप्रमाणे विकल्प देऊन संबंधित शिक्षकाने / उपमुख्याध्यापकाने पदोन्नतीनंतर आपली पूर्वीच्या पदावरील वरिष्ठ श्रेणी स्वीकारली असेल तर त्या वेतनश्रेणीमध्ये (पूर्वीच्या पदावरील कालावधीसह) १२ वर्षे झाल्यानंतर विहित अटी व शर्तीची पूर्तता करणा-या शिक्षकास त्याच्या पूर्वीच्या पदावरील निवड श्रेणी देय ठरेल. उदाहरणार्थ उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील वेतन बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४००/- (वरिष्ठ श्रेणी) मध्ये वेतन घेणा-या शिक्षकाची पदोन्नतीने उच्च माध्यमिक संलग्नित माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापकपदी नियुक्त झालेल्या व पूर्वीच्या पदावरील वेतनास संरक्षण मिळालेल्या शिक्षकाला त्याच्या पूर्वीच्या पदावर १२ वर्षानंतर ज्यावेळी निवडश्रेणी (वेतन बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५७००/- ) देय झाली असती त्यावेळी ती निवडश्रेणी पदोन्नतीच्या पदावर असतानाही देय होईल. मात्र पदोन्नतीच्या पदावर निवड श्रेणी देय होण्यासाठी वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यानंतर १२ वर्षांची सेवा पूर्ण होण्याची अट तसेच इतर अनुषंगिक अटी व शर्ती कायम राहतील.

३) वरीलप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन संरक्षित होत असल्यास अशा शिक्षक कर्मचा-यांच्या वैयक्तिक मान्यता आदेशामध्ये तशी नोंद मान्यता देणा-या संबंधित सक्षम प्राधिका-याने करणे आवश्यक आहे.

हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३०२/२०१२/सेवा-३, दिनांक ७ जून, २०१२ अन्वये मिळालेल्या संमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www. maharashtra. gov.in वर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र.२०१२०७१९१३२३३००५०० असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( प्र. सू. प्रधान )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद
शिक्षण निरीक्षक (पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हा परिषद
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी
निवड नस्ती, कार्यासन माशि-२.